# मिरा भाईदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय भाईदर, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग,
भाईंदर (प.), ता. जि. ठाणे ४०१ १०१ दुरध्वनी क्र.२८१८११८२, २८१९२८२८

## पशुसंवर्धन विभाग

जा.क्र.मनपा/प.सं./ ५८ /२०२५-२६ दि. :-१६/०६/२०२५.

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय:- प्रेस नोट वृत्तपत्रात प्रसिध्द करण्याबाबत.**

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट श्वानांचे / मांजरांचे निर्बिजीकरण व लसीकरण कामाचा ठेका मे. प्रतापराव राणे एजुकेशन ॲन्ड चॅरीटेबल ट्रस्ट यांना देण्यात आलेला आहे. या बाबतची प्रेस नोट वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यांत यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (पशुसंवर्धन)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा-भाईंदर महानगरपालिका
MIRA-BHAINDAR MUNICIPAL CORPORATION
कार्यालय : स्व. इंदिरा गांधी भवन छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता. जि. ठाणे-४०११०१.
दुरध्वनी : 022-28192828 / 28193028 / 28181183 / 28181353 / 28145985
ईमेल : headoffice@mbmc.gov.in वेबसाईट : www.mbmc.gov.in
मुख्य कार्यालय


जा.क्र./मिभा / मनपा / ५८ / २०२४-२६ दिनांक २६/०६/२०२४

## // प्रेस नोट //

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील नागरीकांना कळविण्यांत येते की, Animal Welfare Board of India (Animal Birth Control, Rules 2023) नुसार मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मोकाट श्वानांवर व मांजरावर निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरणाचा ठेका मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना देण्यात आलेला असून सदर प्रकल्प उत्तन शिरे गावठण, मराठी शाळेजवळ, उत्तन येथे कार्यान्वीत आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील मोकाट श्वानांवर व मांजरावर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण प्रस्तावित असून आपल्या कार्यक्षेत्रातील निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण न झालेल्या श्वानांची व मांजरांची माहिती **मे. प्रतापराव राणे एज्युकेशन ॲण्ड चॅरिटेबल ट्रस्ट, यांना मो. नं. 8976835431** वर देण्यात यावी. यापुर्वी मोकाट श्वानांवर व मांजरावर निर्बिजकरण व शस्त्रक्रिया केलेल्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह करण्यात आलेले आहे. ज्या श्वानांच्या उजव्या बाजुच्या कानावर V आकाराचे चिन्ह नसेल अशा श्वानांची माहिती वरील भ्रमणध्वनी क्रमांकावर देण्यात यावी जेणेकरून मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील श्वानांवर / मांजरांवर 100 % निर्बिजीकरण शस्त्रक्रिया व लसीकरण शक्य होईल.

सदरचे काम AWBI Rules 2023 नुसार करण्यात येत असुन प्राणी प्रेमी संघटना व इतर व्यक्ती यांचेकडुन मोकाट श्वान/ मांजर पकडणे किंवा सोडण्याचा ठिकाणी तसेच ह्या संबधित कामाबाबत अडथळा करण्यात येउ नये अन्यथा संबधितावर कायदेशीर कारवाई प्रस्तावीत करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (पशुसंवर्धन),
मिरा भाईंदर महानगरपालिका

C:\Users\Dell\Desktop\अस्मिता देवे\प्रेस नोट 2025.docx